!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४५१ ०३-०२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संभाजीनगर-अजंठा-एलोरा हेलिकॉप्टर सेवा मार्च महिण्याच्या दुसऱ्या आठवड्यात सुरु होणार

# खासदार चंद्रकांत खैरे यांचा पाठपुरावा

**संभाजीनगर ( ता. ०३ ) :** संभाजीनगर-अजंठा-एलोरा हेलिकॉप्टर सेवा मार्च महिण्याच्या दुसऱ्या आठवड्यात सुरु होणार असुन संभाजीनगर-शिर्डी-संभाजीनगर हेलिकॉप्टर सेवेला धोरणात्मक मान्यता मिळाली असल्याची माहिती पवन हंसचे सीएमडी डॉ. बी. पी. शर्मा यांनी पेपर लिड ऑन टेबल कमिटीचे चेअरमन तथा शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांना दिली.

संभाजीनगर शहराच्या लगत असलेली धार्मीक व ऐतिहासिक पर्यटन स्थळे हेलिकॉप्टर सेवेनी जोडली जावीत यासाठी गेल्या अधिवेशनाच्या अगोदर संसदीय कागदपत्रिय समितीच्या बैठकित अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांनी मागणी केली होती. त्या संदर्भातील माहिती पवन हंस या हेलिकॉप्टर सेवा देणाऱ्या कंपनीच्या सीईओ डॉ. बी. पी. शर्मा यांनी खासदार चंद्रकांत खैरे यांची आज दिल्ली येथे भेट घेऊन दिली. संभाजीनगर-अजंठा-एलोरा ही हेलिकॉप्टर सेवा मार्च महिण्याच्या दुसऱ्या आठवड्यात सुरु होणार आहे. फर्दापुर येथे दोन हेलिपॅड अस्तितवात आहे. एलोरा लेणी जवळ दोन हेलिपॅड उभारण्याचे काम बाकी असल्याने सेवा सुरु होण्यास उशीर होत असल्याचे सांगत हेलिपॅडचे काम पूर्ण होताच सेवा सुरु होईल. अशी माहिती डॉ. शर्मा यांनी खासदार चंद्रकांत खैरे यांना दिली.

एम टी डि सी च्या माध्यमातुन ही हेलिकॉप्टर सेवा चालवण्यात येणार असुन महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांना जोडून दुसऱ्या पर्यटन सर्कीट मधील पर्यटकांना व विदेशी पर्यटकांना अजंठा, एलोरा, शिर्डी, महाराष्ट्रातीलप्रमुख किल्ले ऐतिहासिक स्थळांकडे वळविण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे, सध्या महाराष्ट्रात मुंबईला मुंबई दर्शन या नावाने ही हेलिकॉप्टर सेवा पवन हंसच्या माध्यमातुन सुरु आहे. तर मुंबई-मुरुड-जंजिरा ही सेवा लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे डॉ. शर्मा यांनी संसदेच्या पेपर लिड कमिटी ऑन टेबलचे अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांना सांगितले. संभाजीनगर - शिर्डी - संभाजीनगर या हेलिकॉप्टर सेवेला सैधांतिक मान्यता मिळाली असल्याचेही त्यांनी सांगितले. या विषयासंदर्भात खासदार चंद्रकांत खैरे व पवन हंसचे सीईओ डॉ. बी. पी. शर्मा यांनी एमटीडीसीचे कार्यकारी संचालक पराग जैन यांच्या सविस्तर चर्चा केली. व महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे हेलिकॉप्टरने जोडण्यासाठी मंजुर प्रकल्प व धोरणात्मक मान्यता मिळालेले प्रकल्प आणि प्रस्तावित प्रकल्पाच्या कामाला गती द्यावी, अशी सुचना अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांनी केली. संसदीय अधिवेशनापुर्वी पार पडलेल्या संसदीय कागदपत्रिय समितीच्या बैठकित या प्रकल्पाला चालना देण्यासंदर्भात सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार एमटीडीसी व पवन हंसचे कार्य सुरु असुन या सेवा सुरु झाल्यानंतर विदेशी तसेच देशांतर्गत पर्यटकांची संख्या वाढवून वेळ वाचल्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटन सर्किटला ही चालना मिळणार असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525